सूचनानुसार दि.१ ऑक्टोबर रोजी एक तारीख एक तास महाश्रमदान ग्रामपंचायतीतील शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र शासकीय कर्मचारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# सायबर सुरक्षा कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती



शहादा : पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शहादा येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून क्विक हिल फाऊंडेशन, महाराष्ट्र राज्य सायबर पोलीस विभाग, संगणकशास्त्र विभाग कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांच्या सहयोगाने परिसरातील विविध शाळा, महाविद्यालयांमध्ये सायबर साक्षरता कार्यशाळेचे आयोजन दि. २३ ते २६ सप्टेंबर दरम्यान करण्यात आले.

पूज्य साने गुरुजी मंडळाचे औषनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कृषि महाविद्यालय, तंत्रनिकेतन महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अभियांत्रिकी महाविद्यालय, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, कस्तुरबा बालिका विद्यालय आणि श्री सातपुडा विद्यालय येथे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यशाळेद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. विद्यापीठाच्या संगणकशास्त्र विषयाच्या विद्यार्थिनी कु. गायत्री ठाकरे व श्रेया भोम्बे यांनी सायबर गुन्ह्यापासून तसेच त्याद्वारे होणाऱ्या फसवणुकीपासून सुरक्षित राहण्यासंबंधी विस्तृत माहिती दिली. रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेंद्र पाटील यांनी प्रत्येक कार्यक्रमासाठी प्रास्ताविक केले तसेच रासेयो स्वयंसेविका कु. हिनल पटेल हीने आभार व्यक्त केले. या जनजागृती कार्यक्रमात एकूण २१४७ विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेविषयी माहिती जाणून घेतली व प्रातिनिधिक स्वरूपात अभिप्राय दिला. कार्यक्रमात प्रत्येकाने सायबर सुरक्षा शपथ घेऊन आपण व आपल्या परीजनांना सायबर धोक्यापासून बचावासाठी प्रयत्न करण्याच्या निर्धार केला. या कार्यक्रमाचे आयोजन मंडळाचे समन्वयक प्राचार्य मकरंद पाटील, प्राचार्य प्रा. डॉ. आर.एस. पाटील आणि जळगाव विद्यापीठाचे सायबर सुरक्षा जनजागृती उपक्रमाचे समन्वयक डॉ. राजू आमले यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य प्रा. डॉ. एस. पी. पवार (औषधनिर्माणशास्त्र), प्राचार्य प्रा. एन. जे. पाटील (अभियांत्रिकी), प्राचार्य डॉ.बी.के. सोनी (तंत्रनिकेतन), प्राचार्य डॉ. आर. एस. पाटील (आय. टी. आय.), प्राचार्य डॉ. प्रकाश पटेल (कृषि), मुख्याध्यापिका श्रीमती नीलिमा पाटील (कस्तुरबा विद्यालय) आणि मुख्याध्यापक श्री.एस. आर. पाटील (सातपुडा विद्यालय) या सर्वांचे अनमोल सहकार्य लाभले. सर्व शैक्षणिक संस्थांचे शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांनी उस्फूर्त सहभाग नोंदवला.

पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बापूसाहेब दीपकभाई पाटील, उपाध्यक्ष जगदीश पाटील, सचिव श्रीमती कमलताई पाटील, समन्वयक प्रा. मकरंद पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मयूरभाई दीपक पाटील, प्राचार्य डॉ.आर.एस.पाटील, उपप्राचार्य डॉ.एम.के.पटेल, डॉ.एस.डी. सिंदखेडकर यांनी विद्यार्थ्यांमध्ये केलेल्या सायबर साक्षरता जनजागृतीबद्दल अभिनंदन केले.रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेंद्र पाटील, डॉ.वर्षा चौधरी, डॉ.वजीह अशहर व रासेयो स्वयंसेवकांनी उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.